रजि. नं. ई-१२९ स्थापना : १५ ऑगस्ट १९७०

।। बहुजन हिताय बहुजन सुखायं ।।

महाराष्ट्र शिक्षण संस्था, पेण संचलित

# सार्वजनिक विद्यामंदिर व ज्युनिअर कॉलेज

पेण-रायगड

फोन : (०२१४३) २५२२२७

## प्रथम वर्ष - कला शाखा



# प्रवेश माहिती पत्रक

॥ बहुजन हिताय बहुजन सुखाय ॥

# महाराष्ट्र शिक्षण संस्था, पेण संचलित

# सार्वजनिक विद्यामंदिर व ज्युनिअर कॉलेज

पेण रायगड

**कला शाखा**

## ❖ शालेय शिस्त व त्या संबंधीचे सर्वधारण नियम :

१) तीन महिने सतत गैरहजर राहिल्यास त्या विद्यार्थ्यांचे नाव कमी करण्यात येईल.

२) शिक्षणाचे माध्यम व विषय, अध्यापनाची पद्धती, शाळेसंबंधी नियम यासंबंधी कोणतीही गोष्ट पालकांना शाळा चालकांवर अधिकाराने लादता येणार नाही. त्याबाबतीत पालकांच्या सूचनांचा सहानुभूतीपूर्वक विचार केला जाईल.

३) जो विद्यार्थी शाळेत शैक्षणिक वर्षाच्या सत्रात हजेरीच्या दिवसांपैकी ७५ टक्क्यांपेक्षा कमी दिवस हजर असेल तर त्याला परीक्षेला बसावयास परवानगी देणे अगर न देणे हे प्राचार्य ठरवतील.

४) शाळेच्या सामानाची व इमारतीची जाणीवपूर्वक नासधूस करणाऱ्या विद्यार्थ्यांकडून नुकसान भरपाई वैयक्तिक / सामाईक घेण्यात येईल. गैरवर्तन करणाऱ्या, परीक्षेत कॉपी करणाऱ्या व ज्यामुळे इतर विद्यार्थ्यांच्या वर्तनावर वाईट परिणाम होण्याची शक्यता आहे. अशा विद्यार्थ्यांस तात्पुरते अगर कायमचेच शाळेतून काढून टाकण्यात येईल.

५) याशिवाय वेळोवेळी शिक्षण खात्याकडून व संस्था संचालकांकडून नियम करण्यात येतील तेही विद्यार्थ्यांवर बंधनकारक राहतील.

६) शालेय वेळेत शाळेच्या आवारात मोबाईल बाळगण्यास मनाई आहे. सदर नियमांचे पालन न केल्यास कडक कारवाई केली जाईल.

७) मोबाईल विद्यार्थ्यांजवळ सापडल्यास सदर मोबाईल वर्षभर विद्यार्थ्यांना परत मिळणार नाही.

## ❖ प्रशालेची वैशिष्ट्ये :

- शिस्त, स्वच्छता व गुणवत्ता या त्रिसुत्रींवर भर
- १०० हून अधिक सी. सी. टी. व्ही. कॅमेरायुक्त प्रशस्त इमारत व वर्गखोल्या.
- जनरेटर / सौरऊर्जाच्या सहाय्याने विद्युत सोय
- सुसज्ज वातानुकुलित ग्रंथालय व कॉम्प्युटर लॅब
- प्रत्येक वर्ग खोल्यात प्रोजेक्टरद्वार ई लर्निंग अभ्यासक्रमाची सोय.
- सुसज्ज व परिपूर्ण प्रयोगशाळा
- उच्चशिक्षित प्रशिक्षित व अनुभवी शिक्षक वर्ग

- शुद्ध व स्वच्छ फिल्टर पिण्याच्या पाण्याची सोय
- नियमित शिक्षक - पालक सभांचे आयोजन
- इ. १२ वीच्या सर्व शाखांचा निकाल सातत्यपूर्ण ९०% च्या वर
- विद्यार्थी सुरक्षेसाठी २४ तास दोन सिक्युरीटी गार्डस.
- मोबाईलवर पूर्ण बंदी.
- प्रशस्त हॉल
- १२ वी नंतर विविध व्यवसायिक शिक्षणासंदर्भात सेमिनार व चर्चासत्रे.
- पोलीस भरती, स्पर्धा परिक्षा व इतर करीअर संबंधी मार्गदर्शनाची शिबीरे.
- कार्ड स्कॅनिंगद्वारे विद्यार्थ्यांचे दैनंदिन उपस्थिती ऑनलाईन माध्यमातून पालकांना माहिती देण्याची सोय. (सोबत दैनंदिन वेळापत्रक, आठवड्याचे वेळापत्रक, निकाल गुणवत्ता)
- इयत्ता ५वी ते ९ वी पर्यंत मोफत तायक्वाडो प्रशिक्षण
- NSS (राष्ट्रीय सेवा योजना) च्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे समाजसेवा शिबीर व उपक्रम.

❖ **गणवेशासंबंधी**

ज्युनिअर कॉलेजमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्याने दररोज गणवेशामध्येच येणे आवश्यक आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे गणवेश राहील.

**विद्यार्थी**

गडद निळया रंगाची फुलपँट व फिकट निळया रंगाचा रेषा असलेला हाफ शर्ट व शाळेने ठरविलेला टाय, बेल्ट, बूट.

**विद्यार्थीनी**

गडद निळया रंगाची सलवार व फिकट निळया रंगाचा रेषा असलेला कुडता व ओढणी. गणवेशाची रक्कम शाळेमध्ये गणवेशविक्रेत्याकडे जमा करणे अनिवार्य आहे.

**उपस्थितीबाबत**

विद्यार्थी / विद्यार्थीनींनी दररोज ठरवून दिलेल्या गणवेशातचे प्रत्येक तासाला उपस्थित राहणे आवश्यक आहे. तसेच प्रत्येक टर्ममध्ये ७५ टक्क्यांपेक्षा जास्त उपस्थिती आवश्यक आहे. अन्यथा परीक्षेस बसण्यास विद्यार्थी पात्र ठरणार नाही.

**पालक उपस्थितीबाबत**

विद्यार्थ्यांच्या पालकाने ( आई - वडील) वर्षातून किमान तीन ते चार वेळा वर्गशिक्षक / प्राचार्य यांच्याशी संपर्क साधून विद्यार्थ्यांच्या प्रगतीबाबत चौकशी करावी. व वार्षिक शिक्षक पालकांची सभा आयोजित केली जाते त्या सभेस उपस्थित रहाणे अनिवार्य राहील.

❖ **ओळखपत्राबाबत**

प्राचार्याच्या सहीने विद्यार्थ्यांचे ओळखपत्र (I-Card) शाळेच्या वेळेत व सर्व शालेय उपक्रमाच्या वेळी संबंधीत विद्यार्थींनी गळयात अडकविणे आवश्यक आहे.

❖ **विषयाबाबत**

**१) इंग्रजी (०१)**
**२) मराठी (०२)**
**३) हिंदी (०४)**
**४) इतिहास (३८)**
**५) भूगोल (३९)**
**६) अर्थशास्त्र (४९)**
**७) पर्यावरण (३१)**
**८) शारीरिक शिक्षण**

**श्री. एस्. एच्. नाईक**
**प्राचार्य**
**सार्वजनिक विद्यामंदिर व ज्युनिअर कॉलेज, पेण**


सार्वजनिक विद्यामंदिर
व ज्युनिअर कॉलेज, पेण.
Click one